**ठळक बातम्या**

- बँकेतल्या ठेवींना अधिक विमा संरक्षण देण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारच्या विचाराधीन, MSME साठी म्युच्युअल क्रेडिट गॅरंटी योजनेला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या हस्ते सुरुवात

- येत्या १० मार्चला राज्याचा अर्थसंकल्प सादर होणार, अर्थसंकल्पीय अधिवेशन ३ मार्चपासून

- ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या संमेलन गीताचं राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन

**आणि**

- रणजी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत मुंबई विरुद्धच्या सामन्यात विदर्भाच्या पहिल्या दिवसअखेर ५ बाद ३०८ धावा

**<><><><><>**

बँकेतल्या ठेवींना अधिक विमा संरक्षण देण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन आहे. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर गैरव्यवहारांमुळं बँक खात्यात पैसे अडकून पडलेल्या खातेदारांना अधिक रक्कम काढता येईल. वित्तीय सेवा विभागाचे सचिव एम. नागाराजू यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेतल्या घोटाळ्याच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. सध्या DICGC मार्फत ५ लाखापर्यंतच्या ठेवी परत मिळतात.

**होल्ड (१,२३ सेकंद)**

*वीमा एजंटकडून काही वेळा ग्राहकांना फसवून वीमा योजनेची विक्री केली जाते. हे प्रकार टाळण्यासाठी वीमा योजनेची खरेदी केल्यानंतर एक वर्षापर्यंत ग्राहकांना फेरविचार करता येईल. या कालावधीत त्यांना योजना आवडली नाही तर या योजनेसाठी भरलेला पूर्ण प्रीमियम परत मिळेल, अशी तरतूद केल्याचंही अर्थमंत्र्यांनी सांगितलं. महाराष्ट्रासाठी या अर्थसंकल्पात पुरेशा तरतुदी नसल्याचं विरोधकांच्या आरोपांवर अर्थमंत्री निर्मला सीतारामण म्हणाल्या, केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ राज्यातल्या गुंतवणूकदारांनाही मिळतो आहे. केंद्र सरकारच्या धोरणामुळेच संरक्षण उत्पादन निर्यातीत महाराष्ट्र आघाडीवर आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधलं.*

*गेल्या काही दिवसात देशातल्या शेअर बाजारातून मोठ्या प्रमाणात घसरण सुरू आहे. परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार पैसे काढून घेत असल्यानं ही घसरण सुरू आहे. यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नावर अर्थमंत्री म्हणाल्या, देशातल्या बाजारपेठांमधून गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळत असल्यानं गुंतवणूकदार पैसे काढून घेत आहे. जागतिक पातळीवर अस्थिरता निर्माण झाल्यावर हे प्रकार होतात, असं वित्त सचिव तुहीन कांत पांडे म्हणाले. शेअर बाजारांचं नियमन सेबीकडे आहे. बाजारात जेव्हा गैरप्रकार होतील, तेव्हा सरकार त्यात हस्तक्षेप करेल, असंही त्यांनी स्पष्ट केलं. करदात्यांना पर्याय उपलब्ध असावा म्हणून आयकराच्या संदर्भात जुनी आयकर रचना सरकारनं कायम ठेवली आहे. मात्र अधिकाधिक करदाते नव्या कर रचनेला स्वीकारत असल्याचं ते म्हणाले.*

**<><><><><>**

MSME साठी म्युच्युअल क्रेडिट गॅरंटी योजनेची सुरुवात आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या हस्ते आज मुंबईत झाली. अर्थसंकल्पाच्या संदर्भात विविध उद्योजकांशी चर्चा करण्यासाठीच्या कार्यक्रमात त्यांनी या योजनेची सुरुवात केली. या योजनेमुळे MSME ना यंत्रसामग्री किंवा उपकरणं खरेदी करण्यासाठी १०० कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज तारणमुक्त स्वरुपात उपलब्ध होईल.

स्वामीह निधीचा लाभ घेतलेल्या घर खरेदीदारांना त्यांनी घरांच्या चाव्या सुपूर्द केल्या.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय सीमा शुल्क दिनानिमित्त नव्या मुंबईत उरण इथं जेएनपीए टाऊनशीपमधल्या सभागृहात आयोजित विशेष कार्यक्रमालाही सीतारामन उपस्थित राहिल्या. सीमा शुल्क विभागाशी संबंधित एकल अनुबंध बॉन्ड, ऑनलाइन कस्टम रिफंड, वेग या तीन नवीन बॉन्ड्सचं उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं.

कस्टम मॅन्युअलच्या डिजिटल आवृत्तीचं प्रकाशन यावेळी करण्यात आलं. तसंच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या 20 कस्टम अधिकाऱ्यांना सन्मानित करण्यात आलं.

बंदरावरून होणारी तस्करी रोखतानाच त्यामागे असलेल्यांचा शोध घ्या, असं सितारामन यावेळी म्हणाल्या. केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरीही यावेळी उपस्थित होते. अमली पदार्थ, प्राणी तस्करी याकडे अधिक लक्ष देण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली.

**<><><><>**

अर्थमंत्री अजित पवार राज्याचा अर्थसंकल्प १० मार्च रोजी सादर करणार आहेत. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला ३ मार्चपासून सुरुवात होणार आहे. पहिल्या दिवशी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर राज्यपालांचं अभिभाषण होईल.

**<><><><>**

नवी दिल्लीतल्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त तयार केलेल्या संमेलन गीताचं प्रकाशन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते आज मुंबईतल्या राजभवनात झालं. मराठी भाषा मंत्री उदय सामंत यावेळी उपस्थित होते. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे, आता मराठी भाषेला जागतिक स्तरावर नेण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत, असं राज्यपालांनी यावेळी सांगितलं. हे संमेलन गीत ज्येष्ठ गायक हरिहरन, शंकर महादेवन, प्रियंका बर्वे, मंगेश बोरगावकर, शमीमा अख्तर आदींनी गायलं आहे.

**<><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत आज नागपुरात सुरु झालेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात विदर्भानं दिवसअखेर ५ बाद ३०८ धावा केल्या. मुंबईविरुद्धच्या या सामन्यात विदर्भानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला.

दानीश मालेवारनं ७९, तर धुव्र शोरीनं ७४ धावा केल्या. करुण नायरनं ४५ धावांचं योगदान दिलं. आजचा खेळ थांबला तेव्हा यश राठोड ४७, तर कर्णधार अक्षय वाडकर १३ धावांवर खेळत होता. मुंबईतर्फे शिवम दुबे आणि शम्स मुलानी यांनी प्रत्येकी २, तर रॉयस्टन डायसनं १ गडी बाद केला. अहमदाबाद इथं सुरु असलेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात, गुजरातविरुद्ध, प्रथम फलंदाजी करताना केरळनं पहिल्या दिवसअखेर चार बाद २०६ धावा केल्या. आजचा खेळ थांबला तेव्हा कर्णधार सचिन बेबी ६९, तर महंमद अजहरुद्दीन ३० धावांवर खेळत होता.

<><><><><>

नांदेड जिल्ह्यातल्या कुंटूर तांडा इथल्या परीक्षा केंद्रावर बारावीच्या परीक्षेत कॉपी करणाऱ्या चार विद्यार्थ्यांना पकडलं. विमुक्त जाती भटक्या जमाती कनिष्ठ महाविद्यालयात आज फिजिक्स अँड लॉजिकचा पेपर सुरू असताना या विद्यार्थ्यांनी कॉपी केली.

<><><><><>

पीएम आशा अर्थात, प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षण अभियाना अंतर्गत किमान आधारभूत दराचा अभ्यास आणि अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकारनं एक समिती स्थापन केली आहे. त्याबाबतचा शासन आदेश आज जारी केला.

त्यानुसार, सहा सदस्यांच्या या समितीच्या अध्यक्षपदी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक असतील. राज्यात किमान आधारभूत दर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीनं ही समिती राज्यशासनाला शिफारसी आणि सूचना करेल. त्याबाबतचा तपशीलवार अहवाल महिनाभरात सादर करायचा आहे.

<><><><><>

पाण्याची मागणी गेल्यावर्षीपेक्षा कमी असल्याने सिंचन अधिक प्रभावी होईल याची दक्षता जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी घ्यावी असे निर्देश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी साताऱ्यात दिले. धऱणातलं पाणी सर्वांना विश्वासात घेऊन वितरित करावं, कोणताही वाद होणार नाही याची खबरदारी घ्यावी, अशा सूचना विखे पाटील यांनी दिल्या.

<><><><><>

शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीत अहिल्यानगर जिल्हा देशासाठी दिशादर्शक ठरावा यासाठी एकत्रित काम करण्याच्या सूचना जिल्ह्याचे पालक सचिव प्रवीण दराडे यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात १०० दिवस कृती आराखड्याबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते.

<><><><><>

HSRP म्हणजेच उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट बसवण्याची मुदत राज्य परिवहन विभागानं ३० एप्रिल पर्यंत वाढवली आहे. याआधी ही मुदत ३१ मार्चपर्यंत होती. वाहनांची संख्या जास्त असल्यानं परिवहन विभागानं हा निर्णय घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राज्यात २०१९ पूर्वीच्या सर्व वाहनांना HSRP बसवणं बंधनकारक आहे.

<><><><><>

सन २०२४ च्या पिक विम्याचा मोबदला द्यावा, या मागणीसाठी अखिल भारतीय किसान सभेनं आजपासून बीड मधल्या विमा कंपनी कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केलं आहे.

<><><><><>

भारतातून ऑस्ट्रेलियाला पहिल्यांदाच समुद्रमार्गे डाळिंबांची निर्यात करण्यात आली. अपेडा अर्थात कृषी आणि प्रक्रिया केलेले अन्न उत्पादने निर्यात विकास

प्राधिकरणानं सोलापूरमधल्या डाळिंबांची ही निर्यात केली. यामुळं वाहतूक खर्चात मोठ्या प्रमाणात बचत झाली. गेल्यावर्षी जुलैमध्ये पहिल्यांदा हवाईमार्गे निर्यात झाली होती.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण इथल्या, राजकोट परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची पायाभरणी परवा १९ फेब्रुवारीला होणार आहे. छत्रपतींचा योद्ध्याच्या वेषभूषेतील ६० फुटी पूर्णाकृती पुतळा इथं उभारण्यात येत आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वतीने पहिल्या वरिष्ठ ग्रीको रोमन राज्यस्तरीय अजिंक्यपद महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या २२ आणि २३फेब्रुवारी रोजी लोणीकंद मधल्या हिंद केसरी मैदानावर ही स्पर्धा होणार आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**